(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२१] ७ एस सी आर (३१९-३३१)

भूपेश राठोड

विरुद्ध

दयाशंकर प्रसाद चौरसिया आणि इतर

(फौजदारी अपील क्र. ११०५/२०२१)

१० नोव्हेंबर, २०२१

[न्यायमूर्ती संजय किशन कौल आणि न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश]

परक्राम्य लेख अधिनियम, १८८१- कलमे १३८, १४२: अपीलकर्ता-कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी कलम १३८ अन्वये दाखल केलेली तक्रार – तक्रारीसोबत जोडलेल्या धनादेश न वटल्याबद्दल व्यवस्थापकीय संचालकांना तक्रार दाखल करण्याचा अधिकार देणारा संचालक मंडळाचा ठराव – तक्रार योग्य नमुन्यात नसल्याचा उत्तरवादीचा बचाव आणि सदरची तक्रार आणि त्या सोबत जोडलेला संचालक मंडळाच्या ठरावामुळे ती कंपनीच्या वतीने दाखल करण्यात आल्याचा निष्कर्ष निघाला नाही - असा निर्णय दिला की - तक्रारीच्या स्वरूपावरून हे अगदी स्पष्ट होते की व्यवस्थापकीय संचालकांनी कंपनीच्यावतीने तक्रार दाखल केली होती - असे स्वरूप असू शकते जेथे कंपनीच्या नावाचे

प्रथम वर्णन केले जाते, व्यवस्थापकीय संचालकांमार्फत दावा दाखल केला जातो परंतु त्यात मूलभूत दोष असू शकत नाही कारण व्यवस्थापकीय संचालकाचे नाव आधी नमूद केले जाते आणि त्यानंतर कंपनीत असलेले पद - केवळ तक्रारीच्या मजकुरामध्ये प्राधिकारपत्राचा तपशील नाही म्हणून तक्रारीत त्रुटि आहे असे म्हणणे खूप तांत्रिक दृष्टीकोनाचे ठरेल – कृत्रिम व्यक्ती म्हणून कंपनीला एखाद्या व्यक्ती/अधिकाऱ्यामार्फत कार्य करावे लागेल, ज्यात तार्किकदृष्ट्या अध्यक्ष किंवा व्यवस्थापकीय संचालकांचा समावेश असेल – केवळ प्राधिकारपत्राच्या अस्तित्वाची पडताळणी केली जाऊ शकते - उत्तरवादीने त्याच्या स्वाक्षरीवर आक्षेप घेतला नाही, धनादेश कोणत्या परिस्थितीत देण्यात आले आहेत म्हणजेच तो धनादेश योग्य वेळी का देण्यात आला नाही त्याला हे दाखवून द्यायचे होते – कोणत्याही लबाडीबाबत किंवा चुकीचा अर्थ लावण्यासाठी याचिका नव्हती - तक्रार योग्य रीतीने दाखल करण्यात आली होती आणि उत्तरवादीने चेकधारक असलेल्या आदात्यास देय असलेल्या आर्थिक दायित्वाची पूर्तता का केली नाही, हे उघड करण्यात अपयशी ठरले - तक्रार जुलै, २००६ मध्ये दाखल करण्यात आली - दिलेल्या परिस्थितीत, उत्तरवादीला एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा आणि धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट म्हणजेच एकूण ३,२०,०००/- रुपयांच्या दंडासह शिक्षा ठोठावण्यात यावी. तथापि, कालप्रभावाने, त्याने अपीलकर्त्याला आणखी रु. १,६०,०००/- ची रक्कम भरल्यास शिक्षा स्थगित केली जाईल.

अपील मंजूर करत न्यायालयाने असा निर्णय दिला की:

१. उत्तरवादीने धनादेशांवरील त्याच्या स्वाक्षरीवर आक्षेप घेतला नाही, धनादेश कोणत्या परिस्थितीत देण्यात आला म्हणजेच धनादेश योग्य वेळी का देण्यात आला नाही, हे सिद्ध करायचे होते. एनआय अधिनियमाच्या कलम १३९ मधील शब्द अगदी स्पष्ट आहेत की जोपर्यंत विरुद्ध बाजू सिद्ध होत नाही तोपर्यंत असे गृहीत धरले जाईल की धनादेशधारकाला कोणत्याही ऋणाच्या किंवा इतर दायित्वाच्या संपूर्ण किंवा अंशतः वितरणासाठी कलम १३८ मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाचा धनादेश मिळाला. व्यवहाराचे स्वरूप कलम १३८ च्या कक्षेबाहेरील स्वरूपाचे होते, असा खटला उत्तरवादीने दाखल केलेला नाही. तांत्रिक आक्षेप घेण्यापलीकडे प्रत्यक्षात ठोस बाबींवर काहीच बोलले गेले नाही. [परिच्छेद १७] [३२७-एच; ३२८-ए-बी]

२. कलम १४२ (१) (अ) अन्वये विहित केलेला एकमेव पात्रता निकष म्हणजे आदाता किंवा धारकाने तक्रार योग्य वेळी केलेली असावी. कंपनीच्या वतीने व्यवस्थापकीय संचालकांनी तक्रार दाखल केल्याचे तक्रारीच्या स्वरूपावरून उघड होते. कंपनीचे नाव प्रथम वर्णन करणे, व्यवस्थापकीय संचालकांमार्फत खटला भरणे असे स्वरूप असू शकते परंतु केवळ व्यवस्थापकीय संचालकाचे नाव प्रथम आणि नंतर कंपनीत भूषवलेले पद नमूद केले जाते, म्हणून हा मूलभूत दोष असू शकत नाही. [परिच्छेद १८, २२] [३२८-बी-सी; ३२९-ए-बी]

त्र्यंबक एस. हेगडे विरुद्ध श्रीपाद फौज. अपील क्र. ८४९-८५०/२०११ मध्ये २३.०९.२०२१ रोजीचा निकाल; असोसिएटेड सिमेंट कंपनी लिमिटेड विरुद्ध केशवानंद (१९९८) १ एससीसी ६८७ :१९९७] ६ एससीआर ५००; एम. एम. टी. सी. लि. आणि इतर वि. मेडचल केमिकल्स अँड फार्मा (प्रायव्हेट) लि. (२००२) १ एससीसी २३४: [२००१] ५ एससीआर २६५; क्रेडेन्शियल फायनान्स लिमिटेड विरुद्ध महाराष्ट्र राज्य (१९९८) ३ एमएच. एल. जे ८०५ – संदर्भित.

३. तक्रारीसोबत मंडळाच्या ठरावाची प्रत दाखल करण्यात आली. व्यवस्थापकीय संचालकांच्या लाभात प्राधिकारपत्राच्या वस्तुस्थितीची पुष्टी करणारे प्रतिज्ञापत्र कंपनीने न्यायचौकशी न्यायालयाच्या अभिलेखावर सादर केले होते. व्यवस्थापक किंवा व्यवस्थापकीय संचालक यांना सामान्यत: अगदी नामपद्धतीने कंपनीच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी, कंपनीच्या कामकाजाची प्रभारी व्यक्ती म्हणून घेतले जाऊ शकते आणि अशा कार्यांतर्गत खटला सुरू करण्यासाठी, दिवाणी कायदा किंवा फौजदारी कायद्यांतर्गत न्यायालयात जाण्याच्या कृतीस निश्चितपणे क्रियाकलाप संबोधले जाईल. केवळ तक्रारीच्या मजकुरात प्राधिकारपत्राचा तपशील नसल्यामुळे तक्रारीत त्रुटि आहेत असे म्हणणे हा खूप तांत्रिक दृष्टिकोनाचे ठरेल. कंपनीने एक कृत्रिम व्यक्ती म्हणून एखाद्या व्यक्ती/अधिकाऱ्याच्या माध्यमातून कार्य करण्याची आवश्यकता होती , ज्यामध्ये

तार्किकदृष्ट्या अध्यक्ष किंवा व्यवस्थापकीय संचालक यांचा समावेश असेल. केवळ प्राधिकारपत्राचे अस्तित्व सत्यापित केले जाऊ शकते. [परिच्छेद २३] [३२९-बी-ई]

४. सध्याच्या प्रकरणातील प्राधिकारपत्र, ही एक प्रत होती आणि म्हणूनच, बोर्ड सदस्यांची स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही, कारण ती अधिकृततेची खरी प्रत नव्हे तर बोर्डच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा एक भाग ठरते. ठरावाच्या प्रमाणित प्रतीच्या स्वरूपात दिलेल्या प्राधिकारपत्रात असे म्हटले आहे की, कंपनीला आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी, उत्तरवादीने जारी केलेला धनादेश न वटल्यामुळे उत्तरवादीवर कायदेशीर कारवाई करावी लागेल. यासाठी, अपीलकर्त्याला, वकिलांची नेमणूक करणे, वकिलांमार्फत नोटिसा बजावणे, तक्रार दाखल करणे, शपथेवर सत्यापन करणे, न्यायालयात तक्रार दाखल करण्यासाठी मुखत्यारची नेमणूक करणे आणि कायदेशीर कारवाईच्या प्रक्रियेत आवश्यक असलेल्या अशा सर्व बाबींसाठी उपस्थित राहण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्यामुळे, अभिसाक्ष देण्यासाठी अधिकाराचा अभाव असल्याचा दुय्यम न्यायालयाचा निष्कर्ष सुद्धा, अशाप्रकारे, रद्द बातल ठरतो. [परिच्छेद २४, २५] [३२९-ई-एच]

५. ही तक्रार योग्य रितीने दाखल करण्यात आली होती आणि धनादेशधारक असलेल्या आदात्याने उद्भवणारे आर्थिक दायित्व त्याने वेळेत का पूर्ण केले नाही , याचा खुलासा करण्यात उत्तरवादी अपयशी ठरला. जुलै २००६ मध्ये ही तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पंधरा वर्षे उलटून गेली. एनआय अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये, अशा गुन्ह्यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंड किंवा दोन्ही

शिक्षा होऊ शकतात. दिलेल्या परिस्थितीत, उत्तरवादीला एक वर्षाचा कारावास व धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट म्हणजे रु.३,२०,०००/- दंडाची शिक्षा ठोठावण्यात यावी. तथापि, कालांतराने उत्तरवादीने अपीलकर्त्यास रु. १,६०,०००/- ची आणखी रक्कम भरल्यास शिक्षा स्थगित केली जाईल. [परिच्छेद २८, २९] [३३०-ई-एच; ३३१-ए]

केस लॉ संदर्भ

[१९९७] ६ पुरवणी एस.सी.आर. ५००	संदर्भित	परिच्छेद १९
[२००१] ५ पुरवणी एससीआर २६५	संदर्भित	परिच्छेद २०
(१९९८) ३ एमएच. एल. जे ८०५	संदर्भित	परिच्छेद २३

फौजदारी अपीलीय अधिकारीता

फौजदारी अपील क्र. ११०५/२०२१

मुंबई उच्च न्यायालयाने फौजदारी अपील क्र. ८०५/२००९ मध्ये दि. ०३.०८.२०१५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशवरुन उद्भवलेले.

अपीलकर्त्याचे वकील – प्रतापसिंह परमार, कुलदीप सिंह कुचलिया, मो. आरिफ, अजय पाल.

उत्तरवादीचे वकील- व्ही. के. सिद्धार्थन, सम्राट कृष्णराव शिंदे, राहुल चिटणीस, सचिन पाटील, आदित्य ए. पांडे, जिओ जोसेफ.

न्यायमूर्ती संजय किशन कौल यांनी न्यायालयाचा निकाल दिला.

१. उत्तरवादी दयाशंकर चौरसिया यांनी मेसर्स बेल मार्शल टेलिसिस्टीम्स लिमिटेड (थोडक्यात 'कंपनी') या कंपनीला प्रत्येकी रु.२०,०००/- असे एकूण १,६०,०००/- रुपयांचे आठ (८) धनादेश दिले. एचडीएफसी बँक, वसई (ई) शाखा, मुंबई येथे हे धनादेश काढण्यात आले. हे धनादेश वेगवेगळ्या तारखांना काढले गेले होते, परंतु दि. १०.०५.२००६ रोजी प्रदानासाठी एकत्र सादर करण्यात आले होते. दि. १२.०५.२००६ रोजी जारी करण्यात आलेल्या बँक मेमोनुसार अपुऱ्या निधीमुळे सर्व धनादेश वटले नाहीत. धनादेश न वटल्यामुळे लाभार्थ्याकडून परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ (नंतर 'एनआय अधिनियम' म्हणून संबोधले जाईल) कलम १३८ (ब) अन्वये २६.०५.२००६ रोजी कायदेशीर नोटिसा बजावण्यात आल्या. मात्र, नोटीस मिळाल्यानंतर पंधरा (१५) दिवसांच्या आत ही मागणी पूर्ण झाली नाही किंवा कोणतेही उत्तर पाठविण्यात आले नाही, परिणामी भूपेश राठोड यांनी दि. ०७.०७.२००६ रोजी विशेष महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्याकडे तक्रार क्र.१६०/एसएस/०७ अन्वये तक्रार दाखल केली. या तक्रारीसोबत कंपनीच्या संचालक मंडळाने दि. १७.०५.२००६ रोजी भूपेश राठोड यांना कंपनीच्या वतीने उत्तरवादीवर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार दिल्याबाबतचा ठराव जोडलेला होता. दि. २४.१२.२००७ रोजी कंपनीने त्यांचे व्यवस्थापकीय संचालक श्री. भूपेश राठोड यांच्यामार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करून उत्तरवादी विरुद्ध तक्रार दाखल करण्याचा अधिकार वरील संचालक मंडळाच्या ठरावाद्वारे दिल्याचे नमूद केले.

२. तक्रारदाराच्या वर्णनाच्या पद्धतीवर बरेच काही अवलंबून आहे हे लक्षात घेऊन आम्ही तक्रारदाराचे वर्णन खालीलप्रमाणे उद्धृत करतो:

"श्री. भूपेश एम. राठोड,
मेसर्स बेल मार्शल टेलिसिस्टम्स लि.,
या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक,
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यवसाय,
पत्ता: ११०७, व्ही मेकर चेंबर,
नरिमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२१.

३. दि. १७.०५.२००६ रोजी पारित करण्यात आलेला मंडळाचा ठराव खालील प्रमाणे आहे.

"असा ठराव घेण्यात येतो की, दयाशंकर प्रसाद चौरसिया यांनी दिलेल्या धनादेश न वटल्याबद्दल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि कंपनीची हे दायित्व पाडण्यासाठी, श्री. भूपेश राठोड/शशिकांत गणेकर यांना वकिलांची नेमणूक करणे, वकिलांमार्फत नोटिसा बजावणे, तक्रार दाखल करणे, शपथेवर सत्यापन करणे, न्यायालयात तक्रार दाखल करण्यासाठी मुखत्यारची नेमणूक करणे आणि कायदेशीर कारवाईच्या प्रक्रियेत आवश्यक असलेल्या सर्व बाबी हाताळण्याचे अधिकार देण्यात आले आहेत."

बेल मार्शल टेलिसिस्टम्स लिमिटेड साठी.

स्वाक्षरीत/-

दिनांक: १७.०५.२००६.

संचालक".

४. आम्ही उपरोक्त उद्धृत करतो कारण पुरकता आणि तक्रार दाखल करण्याची पद्धत या आमच्यासमोर चर्चेत असलेल्या प्राथमिक विचारार्थ बाबी आहेत.

५. तक्रारीत नमूद करण्यात आलेले प्रकरण असे आहे की, कंपनीने उत्तरवादीला रु.१,६०,०००/- रक्कमेचे कर्ज दिले आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी धनादेश देण्यात आले. ही तक्रार कंपनीच्या वतीने नव्हे तर भूपेश राठोड यांच्या वैयक्तिक क्षमतेत करण्यात आल्याचा आक्षेप उत्तरवादीने घेतला तर दुसरीकडे तक्रार कंपनीच्या नावे असून तक्रारीच्या वाद शीर्षकात त्याने स्वत: व्यवस्थापकीय संचालक असल्याचे सांगितले होते, असा युक्तिवाद अपीलकर्त्याने केला होता. कंपनी अधिनियम १९५६ अन्वये ही कंपनी नोंदणीकृत कंपनी होती. मात्र, नोंदणी प्रमाणपत्र अभिलेखावर सादर करण्यात आले नाही. या बाबीवर, उत्तरवादीचा पुढील युक्तिवाद असा होता की, वरील शीर्षक वर्णनातच फक्त तक्रारदाराचा उल्लेख कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून केलेला आहे परंतु तक्रारीच्या मजकुरात तसा उल्लेख नाही.

६. न्यायचौकशी न्यायालयाने दि. १२.०३.२००९ रोजी दुहेरी युक्तिवादाच्या आधारे उत्तरवादीची निर्दोष मुक्तता केली –

(अ) कर्ज मंजूर केले जात आहे हे दर्शविण्यासाठी उत्तरवादीने स्वाक्षरी केलेल्या वचनपत्राशिवाय कोणतेही दस्तऐवज नव्हते; आणि

(ब) संचालक मंडळाच्या ठरावावर संचालक मंडळाने स्वाक्षरी केलेली नाही (ही खरोखरच मंडळाच्या ठरावाची खरी प्रत होती असे म्हणता येईल).

७. अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात अपील करण्यास प्राधान्य दिले. उच्च न्यायालयाने दि. ०३.०८.२०१५ च्या आक्षेपित आदेशाद्वारे अपील फेटाळून लावले.

८. उच्च न्यायालयाने या निष्कर्षापर्यंत पोहोचताना अनेक मार्ग पार केले, हे लक्षात घेणे समर्पक ठरेल. थोडक्यात युक्तिवाद असा होता:

(अ) एनआय अधिनियमाच्या कलम १४२ (अ) अन्वये आदात्याने किंवा धारकाने योग्य वेळी तक्रार दाखल केली आहे असे म्हणता येणार नाही.

(ब) आदाता ही कंपनी होती आणि तक्रारीचे अवलोकन केल्यास तक्रार कंपनीने दाखल केल्याचे दिसून आले नाही. ती अपीलकर्त्याने दाखल केली होती आणि तक्रारीच्या वाद शीर्षकामध्येच फक्त त्याने स्वतःचे वर्णन कंपनीचा व्यवस्थापकीय संचालक असे केले होते.

(क) कदाचित कंपनीच्या नावाने तक्रार दाखल न करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आला असावा कारण कंपनी कर्ज देण्यास अधिकृत आहे की नाही हे अस्पष्ट होते.

९. कंपनीच्या वतीने डिमांड नोटीस पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने उच्च न्यायालयाने न्यायचौकशी न्यायालयाच्या संपूर्ण कारणमीमांसेस अधिकृतरित्या मान्यता

दिली नाही. त्यामुळे तक्रार कंपनीलाच करावी लागेल, याची कंपनीला कल्पना होती. असे निदर्शनास आले की वरील पैलू बहुधा कंपनीने हेतूने अस्पष्ट ठेवला होता आणि म्हणूनच, एनआय अधिनियमाच्या कलम १४२ नुसार आदात्याने तक्रार दाखल केली नाही, असे मत व्यक्त केले गेले.

<u>तक्रारदार/अपीलकर्त्याचे म्हणणे:</u>

१०. अपीलकर्त्याने आमच्यासमोर असा युक्तिवाद केला की तक्रारीचा अविभाज्य भाग असलेल्या तक्रारीच्या वाद शीर्षकावरून हे स्पष्ट होते की, कंपनीच्या वतीने ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. यामुळेच धनादेश न वटल्याबाबतची तक्रार दाखल करण्याचा व्यवस्थापकीय संचालकांना अधिकार देणारा संचालक मंडळाचा ठराव जोडण्यात आला, असा युक्तिवाद करण्यात आला. दिलेला पत्ता कंपनीचा होता, जो नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता होता. त्या अनुषंगाने उलटतपासणीत दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक या नात्याने तक्रार दाखल करण्यात आली आहे, यात शंका नाही.

११. हे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे की एनआय अधिनियमाच्या कलम १३९ आणि ११८ अंतर्गत एक गृहीतक आहे, ज्याचे उत्तरवादीने खंडन केले नाही. त्र्यंबक एस. हेगडे विरुद्ध श्रीपाद[1] या खटल्यात निर्णीत केल्याप्रमाणे, पुढे असा दावा करण्यात आला की उत्तरदात्याविरुद्ध एनआय अधिनियमांच्या कलम १३९ अन्वये गृहीत धरण्यासाठी योग्य स्वाक्षरी केलेला धनादेश पुरेसा होता. धनादेशावर त्याची स्वाक्षरी नव्हती किंवा कोणत्याही

1 1. फौज. अपील क्र. ८४९-८५०/२०११ मधील दि. २३.९.२०२१ रोजी दिलेला निर्णय.

फसवणुकीखाली किंवा चुकीची माहिती देऊन स्वाक्षरी केली गेली असे बचावात उत्तरवादीचे म्हणणे नव्हते.

१२. या प्रकरणाची अत्यंत अतितांत्रिक दखल घेण्यात आली असून ती केवळ तक्रार दाखल करण्याच्या स्वरूपाशी संबंधित आहे, वस्तुस्थितीशी संबंधित नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. कंपनीच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली होती, अन्यथा एनआय अधिनियमाच्या कलम १४२ (अ) अन्वये दखल घेण्यास नकार दिला असता, असे न्यायचौकशी न्यायालयानेच मान्य केले होते. कंपनीच्या वतीने तक्रार दाखल केली जात नसल्याच्या कारणास्तव उत्तरवादीने समन्स बजावण्याच्या आदेशाला आव्हानही दिले नव्हते.

<u>उत्तरवादींचे म्हणणे:</u>

१३. उत्तरवादीच्या अभ्यासू वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपीलकर्ता वाजवी संशयापलीकडे आपली बाजू सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे आणि तक्रारच योग्य स्वरूपात नाही. तक्रार आणि संचालक मंडळाचा ठराव यातून ती कंपनीच्या वतीने ती दाखल करण्यात आल्याचा निष्कर्ष निघाला नाही. संचालक मंडळाच्या ठरावावर ही कंपनीच्या संचालकांची स्वाक्षरी नव्हती, तसेच तक्रारदाराला तक्रार दाखल करण्याचा अधिकार असल्याचे ही आढळून आले नाही.

१४. उत्तरवादीने असेही म्हटले आहे की कंपनीने कोणतेही कर्ज दिले नाही किंवा कथित कर्ज कोणाच्या खात्यात दिले गेले हे सिद्ध झालेले नाही. कंपनीच्या बाजूने कोणताही कर्ज करार अभिलेखावर ठेवण्यात आला नाही.

<u>आमचे मत:</u>

१५. आम्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे तपासले आहे.

१६. वादाचा निर्णय घेण्यासाठी एनआय अधिनियमाची संबंधित कलमे खालीलप्रमाणे उद्धृत केली जातात:

> **१३८. खात्यात पैसे शिल्लक नसल्यामुळे किंवा अपुरे असल्यामुळे धनादेश न वटल्यास:-**
>
> कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तिला दिलेला धनादेश, जो पैसे धनादेशाने देण्यासाठी म्हणून दिला आहे, जो त्या व्यक्तीचे देणे अंशतः किंवा पूर्णतः देण्यासाठी म्हणून दिला आहे, किंवा इतर कोणतीही जबाबदारी पार पाडण्यासाठी म्हणून दिला आहे, असा धनादेश ज्याला दिला आहे त्या व्यक्तीने आपल्या बँकेच्या खात्यात भरल्यानंतर तो त्याच्या बँकेने ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेकडे वसुलीसाठी पाठविला असता, ज्याने धनादेश दिला आहे त्याचे पैसे शिल्लक नसल्यामुळे वसुलीसाठी पाठविलेल्या बँकेने खातेदाराचे पैसे शिल्लक नाहीत किंवा

अपुरे आहेत किंवा जी व्यवस्था केली आहे त्याहून अधिक रक्कम आहे असा शेरा मारून मूळ बँकेकडे परत पाठविला तर असा धनादेश देणाऱ्याने गुन्हा केला आहे आणि त्याला या अधिनियमाच्या अन्य तरतुदीनुसार जी कारवाई करता येतील त्यास पात्र राहून [त्याला दोन वर्षे पर्यंत] कैदेची शिक्षा होईल किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुपटीइतका दंड होऊ शकेल, किंवा दोन्ही.

मात्र, या कलमात जे सांगितले आहे ते पुढील बाबी झाल्याशिवाय लागू असणार नाही-

(अ) ज्याने एखाद्या व्यक्तीला धनादेश दिला आहे ती एखादी व्यक्ति त्याला दिलेल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत, किंवा धनादेशाच्या संदर्भात जी मुदत दिली आहे ती मुदत संपण्यापूर्वी, जी अगोदरची मुदत असेल, त्या मुदतीच्या आत त्याने तो धनादेश बँकेत भरला असला पाहिजे.

(ब) जेव्हा आदात्यास किंवा धारकास, धनादेश योग्य रीतीने, जे असेल त्या प्रमाणे, बँकेकडून अदत्त धनादेश परत आला या संबंधीची माहिती मिळते तेव्हा तो [तीस दिवसांच्या आत] संबंधीत धनादेश आदेशकाकडे लिखित स्वरूपात नोटीस देऊन सदरच्या रकमेची भरपाई करण्याची मागणी करतो; आणि

(क) असा धनादेश देणारी व्यक्ती अशी नोटिस पोहोचल्यापासून ज्याला धनादेश दिला आहे, किंवा त्याने तो धनादेश दुसऱ्यास हस्तांतरित केला असेल त्याला धनादेश आदेशकास नोटिस मिळल्याबरोबर १५ दिवसांच्या आत पैसे देण्यास अपयशी ठरतो, असे होईल तर.

"१३९. धारण करणाऱ्याच्या वतीने गृहीत धरणे:

जोपर्यंत हे सिद्ध होत नाही, तोपर्यंत असे गृहीत धरले जाईल की धनादेशधारकाला कोणत्याही कर्जाच्या किंवा इतर दायित्वाच्या संपूर्ण किंवा अंशतः वितरणासाठी कलम १३८ मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाचा धनादेश मिळाला.

"११८. परक्राम्य लेखाविषयी अनुमाने — जोपर्यंत याच्या विरुद्ध सिद्ध होत नाही, तोपर्यंत खालील अंदाज बांधले जातील:-

(ग) तो धारक योग्य रीतीने धारण करणारा धारक आहे:- कोणत्याही परक्राम्य लेखाच्या संदर्भात त्याने तो योग्य रीतीने धारण केलेला व क्रमानुसारचा दस्त आहे असे समजायचे. मात्र ज्या प्रसंगी ज्या व्यक्तीच्या ताब्यात तो दस्त वैध रीतीने ताब्यात होता, अशा वैध रीतीने धारण करणाऱ्याच्या ताब्यातून गुन्हा करून, अफरातफर करून, किंवा

अवैध मोबदल्याच्या रूपात घेतला असेल तर अशा प्रसंगी तशा रीतीने धारण करणाऱ्यावर तो दस्त त्याने वैध रीतीने धारण केला आहे- अवैध रीतीने नाही, हे सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी राहील.

....

१४२. गुन्ह्यांची दखल घेण्यासंबंधी - फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही सांगितले असले तरी-

(अ) कलम १३८ अन्वये दंडनीय अपराधाची दखल, ज्याने धनादेश स्वीकारला आहे किंवा धनादेश स्वीकारणाऱ्याने तो दुसऱ्यास हस्तांतरित केला आहे व तो त्याचा धारण करणारा आहे, जसे असेल त्याप्रमाणे, त्या व्यक्तीने लेखी तक्रार दाखल केल्याखेरीज घेणार नाही.

(ब) कलम १३८ मधील तरतुदीच्या खंड (क) अन्वये वाद कारण उद्भवल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशी तक्रार दाखल केली पाहिजे.

[परंतु तक्रारदाराने अशा कालावधीत तक्रार न करण्याचे पुरेसे कारण असल्याचे न्यायालयाला पटवून दिल्यास विहित मुदतीनंतर न्यायालयाकडून तक्रारीची दखल घेतली जाऊ शकते;]

(क) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्यापेक्षा खालचे कोणतेही न्यायालय कलम १३८ अन्वये दंडनीय गुन्ह्याचा खटला चालवू शकणार नाही.

१७. आपण सुरुवातीलाच असे म्हणावे लागेल की उत्तरवादीने धनादेशांवरील आपल्या स्वाक्षरींवर वाद घातला नाही, हे धनादेश कोणत्या परिस्थितीत देण्यात आले आहेत, म्हणजेच तो धनादेश योग्य वेळी का देण्यात आला नाही, हे उत्तरवादीने दर्शविणे आवश्यक होते. एनआय अधिनियमाच्या कलम १३९ मधील शब्द अगदी स्पष्ट आहेत की जोपर्यंत हे सिद्ध होत नाही, तोपर्यंत असे गृहीत धरले जाईल की धनादेशधारकाला कोणत्याही कर्जाच्या किंवा इतर दायित्वाच्या संपूर्ण किंवा अंशतः वितरणासाठी कलम १३८ मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाचा धनादेश मिळाला. व्यवहाराचे स्वरूप कलम १३८ च्या कक्षेबाहेरील स्वरूपाचे होते, असा खटला उत्तरवादीने उभारलेला नाही. तांत्रिक आक्षेप घेण्यापलीकडे प्रत्यक्षात ठोस बाबींवर काहीच बोललेले नाही.

१८. कलम १४२ (१) (अ) अन्वये विहित केलेले एकमेव पात्रता निकष म्हणजे तक्रार आदाता किंवा धारकाने योग्य वेळी केली पाहिजे.

१९. वरील तत्त्वांच्या अनुषंगाने आम्हाला उत्तरवादीच्या याचिकेला सामोरे जावे लागेल की सक्षम तक्रारदाराने तक्रार दाखल केली नाही कारण हे प्रकरण असे आहे की ज्यामध्ये कंपनीने कर्ज दिले होते. तक्रार दाखल करू इच्छिणाऱ्या कॉर्पोरेट संस्थेच्या संदर्भात प्रशासकीय तत्त्वे काय असतील, याचे स्पष्टीकरण असोसिएटेड सिमेंट कंपनी लिमिटेड

विरुद्ध केशवानंद[2] या न्यायालयाच्या न्यायनिर्णयात मिळू शकते. कंपनीच्या नावाने तक्रार केली असेल तर नैसर्गिक व्यक्तीने न्यायालयात अशा कायदेविषयक व्यक्तीचे प्रतिनिधित्व करणे आवश्यक आहे आणि न्यायालय सर्व व्यावहारिक कारणांसाठी नैसर्गिक व्यक्तीकडे पाहते. या संदर्भात असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, संस्था कॉर्पोरेट ही विधित: तक्रारदार आहे, तर न्यायालयीन कामकाजात पूर्वीची बाजू मांडण्यासाठी व्यक्ति वास्तविक तक्रारदार आहे. त्यामुळे ज्या व्यक्तीचा जबाब एकट्याने शपथ घेऊन घेण्यात आला आहे, तो कामकाज संपेपर्यंत कंपनीचे प्रतिनिधित्व करू शकतो , असा आग्रह कोणताही दंडाधिकारी धरू शकत नाही. इतकेच नव्हे तर सुरुवातीला कोणतेही प्राधिकरण नसले तरी कंपनी कोणत्याही टप्प्यावर सक्षम व्यक्ती पाठवून तो दोष दुरुस्त करू शकते.

२०. वरील निर्णयाची दखल एम. एम. टी. सी. लिमिटेड आणि इतर विरुद्ध मेडचल केमिकल्स अँड फार्मा (प्रायव्हेट) लिमिटेड आणि ए.एन.आर.[3] या न्यायालयाच्या नंतरच्या न्यायनिर्णयातही घेण्यात आली.

२१. आम्हाला असे आढळले आहे की वर नमूद केलेल्या न्यायालयीन पूर्वोदाहरणांचे दुय्यम न्यायालयांनी उल्लंघन केले आहे. उच्च न्यायालयाने तक्रारदाराच्या ओळखीची अस्पष्टता आणि कंपनीद्वारे मंजूर केलेल्या कर्जाच्या कायदेशीरतेशी त्याचा संबंध, याविषयी चर्चा सुरू केली, ज्यामध्ये जाणे आवश्यक नव्हते.

---

2 (१९९८) १ एस सी सी ६८७

3 (२००२) १ एस सी सी २३४

२२. आम्ही वर उद्धृत केलेल्या तक्रारीचे स्वरूप पाहिले तर कंपनीच्या वतीने व्यवस्थापकीय संचालकांनी तक्रार दाखल केल्याचे अगदी स्पष्ट होते. कंपनीचे नाव प्रथम वर्णन करणे, व्यवस्थापकीय संचालकांमार्फत खटला भरणे असे स्वरूप असू शकते परंतु केवळ व्यवस्थापकीय संचालकाचे नाव प्रथम आणि नंतर कंपनीत भूषवलेले पद नमूद केले गेले, म्हणून हा मूलभूत दोष असू शकत नाही.

२३. तक्रारीसोबत बोर्डाच्या ठरावाची प्रत दाखल करण्यात आली होती, हेही लक्षात घेणे समर्पक आहे. व्यवस्थापकीय संचालकांच्या बाजूने परवानगी देण्याच्या वस्तुस्थितीला दुजोरा देणारे प्रतिज्ञापत्र कंपनीने न्यायचौकशी न्यायालयात सादर केले होते. व्यवस्थापक किंवा व्यवस्थापकीय संचालक सामान्यत: अगदी नामपद्धतीने कंपनीच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी प्रभारी व्यक्ती म्हणून घेतले जाऊ शकते आणि खटला दाखल करण्यासाठी दिवाणी कायदा किंवा फौजदारी कायद्यांतर्गत न्यायालयात जाण्याची कृती ही निश्चितपणे त्या उपक्रमांतर्गत आहे असे संबोधले जाईल[4]. केवळ तक्रारीच्या मजकुरामध्ये प्राधिकारपत्राचा तपशील नाही म्हणून तक्रारीत त्रुटि आहे असे म्हणणे खूप तांत्रिक दृष्टीकोनाचे ठरेल. कृत्रिम व्यक्ती म्हणून कंपनीला एखाद्या व्यक्ती/अधिकाऱ्यामार्फत कार्य करावे लागेल, ज्यात तार्किकदृष्ट्या अध्यक्ष किंवा व्यवस्थापकीय संचालकांचा समावेश असेल. केवळ प्राधिकारपत्राच्या अस्तित्वाची पडताळणी केली जाऊ शकत होती.

4 क्रेडेन्शियल फायनान्स लिमिटेड वि. महाराष्ट्र राज्य १९९८(३) एम.एच.एल.जे.

२४. आम्ही सध्याच्या प्रकरणात प्राधिकारपत्राकडे वळतो, सध्याच्या प्रकरणातील प्राधिकारपत्र, ही एक प्रत होती आणि म्हणूनच, बोर्ड सदस्यांची स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही, कारण ती अधिकृततेची खरी प्रत नव्हे तर बोर्डच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा एक भाग ठरते. व्यवस्थापकीय संचालक अधिकृत नव्हते, असा चुकीचा निष्कर्ष काढण्यात आला आहे, असेही आम्हाला वाटते. जर आपण ठरावाच्या प्रमाणित प्रतीच्या स्वरूपात प्राधिकारपत्राचा अभ्यास केला तर त्यात असे म्हटले आहे की उत्तरवादीने कंपनीला आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी जारी केलेल्या धनादेश न वटल्याबद्दल त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी लागेल. त्यासाठी, श्री. भूपेश राठोड/शशिकांत गणेकर यांना, वकिलांची नेमणूक करणे, वकिलांमार्फत नोटिसा बजावणे, तक्रार दाखल करणे, शपथेवर सत्यापन करणे, न्यायालयात तक्रार दाखल करण्यासाठी मुखत्यारची नेमणूक करणे आणि कायदेशीर कारवाईच्या प्रक्रियेत आवश्यक असलेल्या अशा सर्व बाबी हाताळण्याचे अधिकार देण्यात आले होते. आणखी काय सांगता येईल?

२५. अशाप्रकारे अभिसाक्ष देण्याच्या प्राधिकारपत्राचा अभाव असल्याचा दुय्यम न्यायालयांनी दिलेला निष्कर्ष ही रद्द बातल ठरतो.

२६. कंपनीच्या वतीने काम करताना व्यवस्थापकीय संचालकांचे नाव प्रथम दिसून येते, त्याशिवाय तक्रारदाराचे संपूर्ण नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यासह वर्णन सुरुवातीलाच दिले जाते. प्रतिज्ञापत्र आणि खटल्यादरम्यान त्यासंदर्भातील उलटतपासणी केली असता , कंपनीच्या वतीने व्यवस्थापकीय संचालकांनी तक्रार दाखल केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे

प्रारूप परिपूर्ण नसले तरी सदोष आहे असे म्हणता येणार नाही. मंडळाच्या ठरावाची प्रत आणि प्रारंभी जे नमूद करण्यात आले आहे ते लक्षात घेता, तक्रारीच्या मजकुरात आणखी काही असण्याची आवश्यकता नाही. कंपनीच्या वतीने अपीलकर्त्याकडून तक्रार दाखल केली जात नसेल तर मंडळाच्या ठरावाची प्रत जोडण्याचे कोणतेही कारण नाही.

२७. आमच्या मते, वर म्हटल्याप्रमाणे सर्वात सबळ पैलू म्हणजे धनादेशांवरील स्वाक्षऱ्या नाकारल्या गेल्या नाहीत. तसेच सही केलेले धनादेश कंपनीला का देण्यात आले, याचे ही पर्यायी कथेद्वारे स्पष्टीकरण देण्यात आले नाही. कोणत्याही फसवणुकीचा किंवा चुकीचा खुलासा केल्याचा दावा करण्यात आला नाही. त्यामुळे असे दिसून येते की, वरील स्थितीला सामोरे जाताना उत्तरवादीने आपली जबाबदारी टाळण्यासाठी केवळ तक्रारीच्या स्वरूपातून उद्भवणारा तांत्रिक युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला. कर्ज कराराची स्वतंत्रपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता नव्हती कारण व्यवहाराचे कोणतेही पर्यायी स्वरूप कधीही सांगितले गेले नव्हते.

<u>निष्कर्ष:</u>

२८. त्यामुळे न्यायचौकशी न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे दोन्ही आक्षेपित आदेश कायम ठेवता येणार नाहीत आणि ते रद्द करणे आवश्यक आहे, असे आमचे मत आहे. त्यामुळे तक्रार योग्य रितीने दाखल करण्यात आली होती आणि धनादेश धारक असलेल्या

आदात्याची आर्थिक जबाबदारी त्याने वेळेत का पूर्ण केली नाही, याचा खुलासा करण्यात उत्तरवादी अपयशी ठरल्याचे निष्पन्न झाले आहे.

२९. आता आपण वरील निष्कर्षांचा परिणाम काय होईल याकडे वळू. जुलै २००६ मध्ये ही तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पंधरा (१५) वर्षे उलटून गेली. एनआय अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये अशा गुन्ह्यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. आमचे असे मत आहे की दिलेल्या परिस्थितीत, उत्तरवादीला एक वर्षाची शिक्षा आणि धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट म्हणजे रु.३,२०,०००/- दंडाची शिक्षा ठोठावण्यात यावी. तथापि, कालांतराने उत्तरवादीने अपीलकर्त्याला रु.१,६०,०००/- ची आणखी रक्कम भरल्यास शिक्षा स्थगित केली जाईल, अशी आम्ही तरतूद करतो. आजपासून दोन (२) महिन्यांच्या आत, उत्तरवादीने आवश्यक ती कार्यवाही करावी. अपीलकर्त्याला खर्च मिळण्याचा ही हक्क असेल.

३०. त्यानुसार वरील अटींमध्ये अपील मंजूर केले जाते.

अपील मंजूर.

X-X-X-X-X

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

X-X-X-X-X